दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
Epaper : https://hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❀ सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : २ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रू. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

## दै. हिंदू प्रकाश वार्ता सत्य आणि समाजहित जपणारे वृत्तपत्र बनावे : प्रा. रामदास गायकवाड

### ‌। त्रिवेणी पर्व : अक्षय्य तृतीयेच्या मुहूर्तावर शानदार सोहळ्यात ई-पेपर, वेब पोर्टलचा शुभारंभ



हिंदू प्रकाश वार्ता । प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर |** दैनिक हिंदू प्रकाश वार्ता या वृत्तपत्राचा प्रकाशन सोहळा , ई- पेपर आवृत्ती आणि वेब पोर्टलचा शुभारंभ प्रमुख मान्यवरांच्या हस्ते रविवार, दि. १९ एप्रिल रोजी दुपारी बीड बायपास रोडवरील एमआयटी महाविद्यालयासमोरील रोन्ड्यूज हॉलमध्ये पार पडला.

याप्रसंगी व्यासपीठावर उद्योजक उदय तोमर, सुरेश जोशी, राजेंद्र बनकर, प्रा. रामदास गायकवाड, महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे विभागीय व्यवस्थापक एस. एस. पाटील, महेश जोशी, उदय देशपांडे, सुधीर कातकडे, ज्ञानेश्वर बारे, संग्राम पठाडे, भोकरचे पत्रकार मन्सूर पठाण, दै. देवगिरी वृत्तचे संपादक अनिल सावंत, दै. औरंगाबाद दर्शनचे संपादक सुरेश क्षीरसागर, दै. मराठवाडा केसरीचे संपादक छबुराव ताके, नवशक्तीचे प्रतिनिधी सुजित ताजने, रोखठोक प्रहारचे संपादक शेख अब्दुल्ला, संपादक शेख शफीक, दै. गांवकरीचे प्रतिनिधी भाऊसाहेब वडजे पाटील, दै. लोकपत्रचे प्रतिनिधी भांबर्डे, दै. हिंदू प्रकाश वार्ताचे संपादक रोहित पाटील आणि व्यवस्थापकीय संपादक पंकज पाटील, कार्यकारी संपादक विकास शेकुजी पाटील यांची उपस्थिती होती.

हिंगोलीचे पोलीस अधीक्षक डॉ. श्रीकृष्ण कोकाटे, पैठणचे शिवसेना आमदार विलास बापू भुमरे आणि माजी विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांचे पूत्र युवा नेते अ‍ॅड. धर्मराज दानवे या मान्यवरांनी सोहळ्यास उपस्थिती दर्शवून आपल्या शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाच्या प्रारंभी श्रीगणेश मूर्तीचे पूजन करून मराठी पत्रकारितेचे जनक आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. स्वर सिंगार म्युझिकल कॉन्सर्ट अँड इव्हेंट्सचे प्रा. जगदीश वेदपाठक आणि संगीत संचाने बहारदार हिंदी -मराठी गीतांचा कार्यक्रम याप्रसंगी सादर करून उपस्थित मान्यवर, सर्व पत्रकार तसेच या कार्यक्रमात रंगारंग कार्यक्रमाने एक वेगळीच रंगत आणली.

आपल्या प्रास्ताविकपर भाषणात बोलताना 'दैनिक हिंदू प्रकाश वार्ता'चे संपादक रोहित पाटील यांनी ई-पेपर, वेब पोर्टल आणि वर्तमानपत्र सुरु करण्याबाबतची भूमिका आणि वाटचालीची माहिती दिली. केवळ शहरांतील बातम्या न देता, ग्रामीण भागातील, सर्वसामान्य माणसाचे प्रश्न आम्ही प्राधान्याने मांडू. ‘ सत्याचा प्रकाश आणि राष्ट्रवादाचा प्रहरी ' या दैनिक हिंदू प्रकाश वार्ताच्या टॅगलाईनप्रमाणे आम्ही आमची भूमिका सतत मांडत राहू असे आश्वस्त केले.

**याप्रसंगी प्रा. रामदास गायकवाड म्हणाले की, |** सध्या पत्रकारिता क्षेत्रात प्रचंड आधुनिक बदल दिवसेंदिवस घडत आहेत. सध्याच्या परिस्थितीत सामाजिक, आर्थिक, विकासात्मक आणि राजकीय बदल घडवण्यासाठी प्रसारमाध्यमांची महत्त्वाची भूमिका असते. बदल्या काळानुसार पंकज आणि रोहित पाटील बंधूंनी बदलत ई-पेपर, वेब पोर्टल आणि वर्तमानपत्र सुरु करीत नवे रूप अंगीकारले आहे. वृत्तपत्र आणि डिजीटल मिडीया क्षेत्रात रोहित आणि पंकज पाटील या दोन तरूण बंधूंनी आपली चुणूक दाखवून देत आव्हान पूण केल्याबद्दल कौतूक केले. खरे कार्यकर्ते हेरून पाटील बंधूंनी पत्रकारिता क्षेत्रात पाऊल ठेवले. साडेतीन शुभ मुहूर्तांपैकी एक असलेल्या अक्षय्य तृतीयेच्या निमित्ताने ई-पेपर, वेब पोर्टल आणि वर्तमानपत्र सुरु करीत खरोखर एक त्रिवेणी पर्व साधले असल्याचे त्यांनी म्हटले. आजच्या वेगवान डिजिटल युगात बातम्यांचा पूर आला आहे, पण या गर्दीत सत्य काय, हे शोधणे कठीण झाले आहे. पत्रकारिता हा केवळ एक व्यवसाय नसून, ती एक सामाजिक जबाबदारी आहे. दैनिक हिंदू प्रकाश वार्ता हे नवीन वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासावर टिकून राहील आणि निर्भीडपणे आपली भूमिका मांडेल यात दुमत नाही.

**महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे विभागीय व्यवस्थापक एस. एस. पाटील म्हणाले की, |** कोविड महामारीच्या काळात पत्रकारितेसह अनेक उद्योगधंद्यांवर विपरित परिणाम झाल्याने आर्थिक आणि सामाजिक प्रश्न निर्माण झालेले होते. आता हळूहळू ही स्थिती पूर्वपदावर येत आहे. रोहित आणि पंकज पाटील या दोन तरूण बंधूंना आव्हानात्मक आणि सामाजिक उत्तरदायित्व पार पाडण्यासाठी माझ्या शुभेच्छा.

**सुरेश जोशी म्हणाले की, |** मैं एक अखबार हूं, मेरी औकात ही क्या हैं? मगर आपके शहर मे आग लगा सकता हूं... असा शेर उपस्थित करत साहित्यिक सुरेश जोशी यांनी प्रसारमाध्यमांचे महत्व अधोरेखित केले.

**दै. देवगिरी वृत्तचे संपादक अनिल सावंत म्हणाले की, |** आजच्या वेगवान डिजिटल युगात बातम्यांचा पूर आला आहे, पण या गर्दीत सत्य काय, हे शोधणे कठीण झाले आहे. दैनिक हिंदू प्रकाश वार्ता या वृत्तपत्राने केवळ ‘वार्ता ' न देता समाजहिताचे, राष्ट्रहिताचे प्रखर ‘ विचार ' मांडावेत अशी आशा व्यक्त करीत हे वृत्तपत्र केवळ मराठवाड्यापुरते मर्यादित न राहता संपूर्ण राज्यभर नावलौकिकास येईल अशी सदिच्छा व्यक्त केली.

या सोहळ्यात उपिस्थत मान्यवरांमध्ये ज्येष्ठ पत्रकार रमेश जाबा, ज्येष्ठ पत्रकार संजय हिंगोलीकर, दै. जनपत्रचे संपादक प्रवीण बुरांडे, ज्येष्ठ पत्रकार रवि टाकसाळ, ज्येष्ठ पत्रकार अभय निकाळजे, पत्रकार भानुदास सरोदे पाटील, दिनेश परेदशी, विनोद खिल्लारे, मच्छिंद्र नागरे, नदीम सौदागर, फर्दापूरचे पत्रकार शेख हक्कानी, शिवना येथील पत्रकार सय्यद जहिरोद्दीन, सिल्लोडचे पत्रकार गजानन मरकड, ज्ञानेश्वर बोरसे, मनिष अग्रवाल, अण्णासाहेब काळे, राजेंद्र बोलणकर, सचिन अंभोरे, विक्रांत कुल्थे, महेश जोशी, बालाजी लांडे, अमोल गवळी, ऋषिकेश पाटील, बशीर पठाण, गुलाब पठाण, शेख अहेमद, शेख युसूफ, प्रशांत बुरांडे, वरद बुरांडे आदींसह शेकडो महिला आणि उद्योजक, व्यापारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांची उपस्थिती होती. प्रकाशन सोहळा कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी दै. हिंदू प्रकाश वार्ताचे मुख्य प्रतिनिधी सिद्धेश्वर थोर, गणेश पुजारी, नितीन दांडगे, वैष्णवी भगत आदींनी सहकार्य केले.

## नवनीत राणा म्हणजे पोसलेली विषवल्ली

### विजय वडेट्टीवारांच्या विधानाने नवा वाद पेटणार!

**.नागपूर (प्रतिनिधी) |** महिला आरक्षण कायद्यात सुधारणा करणारे विधेयक नामंजूर झाल्यानंतर पंतप्रधानांसह भाजपच्या सर्वच नेत्यांनी कॉंग्रेसवर टिकेची झोड उठवत महिला विरोधी असल्याचा आरोप केला. आता भाजपच्या महिला नेत्या नवनीत राणा या जातीय विष पेरण्यासाठी पोसलेली आणि पाणी घालून जिवंत ठेवलेली विषवल्ली असल्याची खरमरीत टिका कॉंग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांनी केली. त्यामुळे नवा वाद निर्माण होण्याची शक्यता बळावली आहे.



कॉँग्रेसचे ज्येष्ठ नेते विजय वडेट्टीवार रविवारी सकाळी नागपुरात प्रसारमाध्यमासोबत बोलत होते. त्यांनी नवनीत राणा यांचा चांगलाच समाचार घेतला. नवनीत राणा या जात आणि धर्मात भांडण लावून सत्तेची पोळी कशी शेकता येईल, यासाठी पाणी घालून जिवंत ठेवण्यात येणारी विषवल्ली आहे, असे ते म्हणाले. महिलांवरील अत्याचारा संदर्भात जात आणि धर्म कुठे येतो? जो जात धर्म आणत असेल तो नालायक आणि हरामखोर असतो त्याला ाशी झाली पाहिजे. तिथे बुरख्यावाले नव्हते असे नवनीत राणा कोणत्या आधारावर बोलल्या. तोंडात आले की काहीपण वाा काढायचे का? या बाईची जीभ जातीयवादी आणि धर्मांध बनली आहे. लोकांनी निवडणुकीत पाडून जिरवली तरी अजून शुद्धीवर यायला तयार नाही. राणा यांना हनुमान चालीसाच्या दोन ओळी बोलता येत नाही ते हिंदू धर्माच्या गोष्टी बोलत आहेत, अशी टीका त्यांनी केली. खरात प्रकरणावर ब्र न काढणाऱ्या नवनीत राणा मुस्लिम तरुण दिसल्याबरोबर बावचाळल्यासारखी बोलतात. हे अत्यंत घृणास्पद आहे, असे वडेट्टीवार म्हणाले.

**राणांसह खासदार बोंडे यांच्यावर गुन्हा दाखल करा**

खासदार अनिल बोंडे डॉक्टर आहेत. डॉक्टर रुग्णाला रक्त देताना धर्म बघत नाही. असा कुणी डॉक्टर असेल तर निषेधार्थ आहे. भाजपचे पुरस्कृत भोंदू तयार झाले आहे. धर्माधर्मात वाद लावणारी धर्मांध शक्तींना पोसले जात असून त्यांची संख्या वाढत आहे. त्यामुळे महिला अत्याचारात वाढ होत असल्याचा आरोप वडेट्टीवारांनी केला. नवनीत राणा यांनी दोन धर्मात तेढ पसरविण्याचा प्रयत्न केला म्हणून त्याच्यावर तसेच खासदार अनिल बोंडे यांनी चुकीची माहिती पसरवली म्हणून त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा, अशी मागणी वडेट्टीवार यांनी केली.

**अजित पवार विमान अपघात प्रकरणी गुन्हा दाखल करा**

अजित पवार यांच्या विमान अपघातावर शंका आहे. या अपघातासंदर्भात संभ्रम कायम आहे. त्यामुळे महाराष्ट्रात एखादा गुन्हा दाखल व्हायला नको का ? परंतु सरकार गुन्हा दाखल करायला तयार नाही. केवळ निवेदन स्वीकारून चालणार नाही. त्यामुळे हे प्रकरण पुन्हा थंड बसल्यात पडेल. सध्या १५० एसआयटी चौकशी महाराष्ट्रात सुरू आहे. ते सर्व थंड बसत्यात आहे. याबाबतही तेच होईल. महाराष्ट्रातील मजबूत नेता गेलेला असताना त्याचा साधा गुन्हा दाखल का होत नाही, असा सवाल विजय वडेट्टीवार यांनी केला.

## दिव्यांगांचे प्रश्न सोडविण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील : रामदास आठवलेंची ग्वाही

### रिपाइं दिव्यांग आघाडी, मातोश्री कौशल्या देवी सेवाभावी संस्थेच्या वतीने दिव्यांगांना जीवनावश्यक साहित्याचे वितरण

हिंदू प्रकाश वार्ता । प्रतिनिधी



**छत्रपती संभाजीनगर |** ज्यांचे अंग दिव्य आहे तो म्हणजे दिव्यांग त्यामुळे आपल्यातील आत्मविश्वास कायम ठेवा. राज्यभरातील दिव्यांगाचे विविध प्रश्न सोडविण्यासाठी मी सदैव प्रयत्नशील राहील अशी ग्वाही केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपाइंचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.रामदास आठवले यांनी रविवारी दिली. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) दिव्यांग आघाडी, मातोश्री कौशल्या देवी सेवाभावी संस्था, बीड यांच्या संयुक्त विद्यमाने दिव्यांग बांधवांसाठी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर आरपीआय युवक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, आरपीआय चे महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष बाबुराव कदम, आरपीआय चे प्रदेशाध्यक्ष डॉ. सिद्धार्थ भालेराव, मराठवाडा विभाग प्रमुख मिलिंद शेळके, जिल्हा अध्यक्ष विजय मगरे, दिव्यांग आघाडीचे प्रदेश सचिव विष्णू वैरागड, छत्रपती संभाजीनगर रिपाइंचे जिल्हाध्यक्ष तुकाराम शिरसाट आदींची उपस्थिती होती. प्रास्ताविक करताना आयोजक तथा आर पी आय दिव्यांग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष सुरेश माने म्हणाले की, दिव्यांगांच्या सर्वांगीण विकासासाठी मी काम करत आहे.मी स्वतः दिव्यांग असल्याने मला प्रत्येक दिव्यांगाच्या प्रश्नांची जाणीव आहे. केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री खा. रामदास आठवले यांनी मला नेहमीच मदत केली आहे , त्यामुळे त्यांच्या कार्याशी प्रेरित होऊन मी सध्या महाराष्ट्रभर कार्य करत आहे. यासाठी मला रिपाइं पक्षातील प्रत्येक कार्यकर्ते, पदाधिकार्यांची मदत होत असल्याचे सुरेश माने यांनी स्पष्ट केले. यावेळी रिपाइं दिव्यांग आघाडीचे प्रदेशाध्यक्ष तथा आयोजक सुरेश माने यांनी राज्यसभेवर तिसर्यांदा रामदास आठवले यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार केला.

दिवसभर आयोजित करण्यात आलेल्या मोफत आधार नोंदणी व आधार अपडेट, नव्याने एस.टी. महामंडळाच्या वतीने देण्यात येणारे एन.सी.एम.सी. कार्ड ची नोंदणी तसेच जीवनावश्यक साहित्याच्या वितरण कार्यक्रमात मराठवाड्यातील दिव्यांगांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. यावेळी पंचाशीला भालेराव यांच्या भीम गीतांच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सद्दाम शेख यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्य व्यवस्थापक बाळासाहेब पोकळे, मुंजा खंदारे, समाधान दाभाडे, जय वराडे पाटील, अजय राऊत, कपिल बनकर, इम्रान शेख यांनी पुढाकार घेतला.

## जमिनीच्या आमिषाने 2.40 कोटींचा गंडा; निवृत्त एसीपीसह 5 जणांवर गुन्हा

**पुणे (प्रतिनिधी) |** जमिनीच्या व्यवहारात मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून तब्बल २ कोटी ४० लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणात निवृत्त सहायक पोलीस आयुक्त आणि त्यांच्या कुटुंबीयांचा समावेश असल्याने खळबळ उडाली आहे. पैसे परत मागितल्यावर थेट खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देणार्या या निवृत्त एसीपीसह ५ जणांवर चतुःश्रुंगी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अभिजित विलास उंद्रे (रा. मांजरी खुर्द) यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे. त्यावरून निवृत्त सहायक पोलीस आयुक्त सुशिल शंकरराव कदम, अनिकेत कदम (दोघे रा. तळवळकर जिम समोर, एफसी रोड), नंदा सुशिल कदम, दत्ता केदारी (रा. बोरज) आणि बाळासाहेब आर. वाळूज (रा. कामशेत, ता. मावळ) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या ३३६(२), ३३८, ३३६(३), ३४०(२), ३३९, ३१६(२), ३१८(४), ३(५) अन्वये हा गुन्हा नोंदवला आहे.

हा सर्व प्रकार भोसले नगर येथील हॉटेल सिंफनी येथे डिसेंबर २०१६ ते २१ मे २०२५ या कालावधीत घडला. आरोपींनी फिर्यादीचा विश्वास संपादन करून पूर्वनियोजित कट रचला. बोरज (जि. पुणे) येथे १२ एकर जमीन विक्रीसाठी उपलब्ध असून, ती मुंबईतील बालकिशन गुप्ता यांच्या मालकीची असल्याचे सांगण्यात आले. गुंतवणुकीवर ‘मोठा नफा मिळवून देतो’ असे आमिष दाखवून आरोपींनी फिर्यादीकडून टप्प्याटप्प्याने कोट्यवधी रुपये उकळले.

आरोपींनी मूळ मालक बालकिशन गुप्ता यांच्या नावाने चक्क बनावट बँक खाते उघडले आणि त्यामध्ये ५० लाख रुपयांची पे-ऑर्डर जमा करून घेतली असल्याची तपासात धक्कादायक माहिती उघडकीस आली आहे. त्यानंतर ‘ॲरिस्टोन मल्टीकेअर प्रा. लि.’ या नावाने आणखी एक बनावट कंपनी खाते उघडून त्यात २५ लाख रुपये आरटीजीएसद्वारे जमा करण्यास भाग पाडले. याशिवाय विविध कारणे सांगत आणखी ३० लाख रुपये (आरटीजीएस व रोख) घेतले आणि पुढे जमीन खरेदीखतासाठी तब्बल १ कोटी ३५ लाख रुपये रोख स्वरूपात घेतले.

पैसे उकळल्यानंतर, मूळ जमीन मालक जिवंत असतानाही त्यांचा मृत्यू झाल्याची खोटी माहिती देऊन आरोपींनी हा व्यवहार लांबवला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादीने पैसे परत मागितले. मात्र, त्यांना जीवे मारण्याची व खोट्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देण्यात आली. चतुःश्रुंगी पोलिसांनी या गंभीर आर्थिक फसवणूक प्रकरणाचा तपास सुरू केला असून, आरोपींच्या आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी केली जात आहे.

दैनिक हिंदू प्रकाशवार्ता
PRGI No.: MHMAR/25/A2358 सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी



## संपादकीय

### ममता दीदींची कसोटी!

प. बंगालमध्ये २३ एप्रिल आणि २९ एप्रिल रोजी विधानसभा निवडणुका होत असून ४ मे रोजी मतमोजणी होणार आहे. या काळात ममता बॅनर्जींभोवती संपूर्ण राजकारण फिरत आहे. पश्चिम बंगालमध्ये सत्ताधारी तृणमुल पक्षाला भाजपाचं कडवं आव्हान आहे. त्यामुळे दोन्ही पक्षांच्या प्रचाराला जोर आला आहे. आरोप-प्रत्यारोपांना उत आला आहे. या लढतीचा केंद्रबिंदू ममता बॅनर्जी असून त्या आजही बंगालच्या राजकारणातील सर्वात प्रभावशाली शक्ती आहेत. त्यांचे स्थान आजही अढळ का आहे, हे समजून घेण्यासाठी केवळ निवडणुकांच्या गणितांच्या पलीकडे जाऊन पहावे लागेल. आगामी विधानसभा निवडणुकीत ममता बॅनर्जींचं राजकीय भवितव्य काय असेल यावर प्रसिद्ध ज्योतिषतज्ज्ञ विक्रम चंदीरामानी यांनी अंदाज वर्तवला आहे.ममता बॅनर्जींचा प्रवास हा कधीच एका पारंपारिक राजकारण्यासारखा राहिला नाही. त्यांचे राजकारण संघर्ष, टिकून राहण्याची जिद्द, प्रसंगावधान, भावनिक आवाहन आणि जनसामान्यांच्या नाडीची अचूक पकड यावर उभे आहे. अनेक दशकांच्या संघर्षातून निर्माण झालेल्या या प्रतिमेमुळे त्या आजही आदरास पात्र आहेत. ५ जानेवारी १९५५ रोजी कोलकात्यात जन्मलेल्या ममता बॅनर्जी यांनी अत्यंत साध्या पार्श्वभूमीतून वर येत भारतीय राजकारणात स्वत:ची ओळख निर्माण केली. १९८४ मध्ये त्यांनी जादवपूरमध्ये सोमनाथ चॅटर्जी यांचा पराभव करून संसदेत प्रवेश केला, हा त्यांच्या कारकिर्दीतील एक मोठा टप्पा होता. हा विजय त्यांच्या 'शनी परतीच्या' काळाशी जुळून आला, जो ज्योतिषशास्त्रानुसार जीवनातील महत्त्वाचे वळण आणि जबाबदारी वाढवणारा काळ मानला जातो. त्यांच्या बाबतीत या विजयाने केवळ संधीच उघडल्या नाहीत, तर दबाव आणि संघर्षातून सतत पुढे जाण्याच्या त्यांच्या जीवनाचा एक आराखडाच तयार केला.त्यांची कुंडली त्यांच्या राजकारणाचे वेगळेपण स्पष्ट करते. धनु राशीतील सूर्य आणि बुध त्यांना वैचारिक शक्ती, स्पष्टवक्तेपणा आणि तडजोड न करण्याची वृत्ती देतात. त्या थेट आणि स्पष्ट बोलतात, यामुळे कधी कधी संघर्ष निर्माण होतो. पण त्यातूनच त्यांची विश्वासार्हता निर्माण होते. वृषभ राशीतील चंद्र त्यांना भावनिक स्थिरता आणि सहनशक्ती देतो. एकदा त्यांनी एखादी भूमिका घेतली की त्या मागे हटत नाहीत. हीच स्थिरता त्यांना मोठ्या राजकीय संकटातही टिकवून ठेवते. कुंभ राशीतील मंगळ त्यांच्या राजकीय संघर्षाची अनोखी आणि कधीकधी धक्कादायक पद्धत दर्शवतो. कारकिर्दीच्या सुरुवातीला त्यांनी महिला आरक्षण विधेयकाचा निषेध करणाऱ्या एका खासदाराला चक्क गचांडी धरून लोकसभेबाहेर काढले होते. ही प्रतिमा त्यांच्या लढाऊ वृत्तीचे दर्शन घडवणारी होती.गुरु कर्क राशीत असल्याने त्यांचे जनतेशी एक विलक्षण भावनिक नाते आहे. यामुळेच त्या लोककल्याणाच्या राजकारणाला केवळ धोरणांपुरते मर्यादित न ठेवता त्याला वैयक्तिक आणि भावनिक स्वरूप देतात. १९९८ मध्ये त्यांनी काँग्रेसमधून बाहेर पडून तृणमूल काँग्रेसची स्थापना केली, जो काळ त्यांच्या साडेसातीच्या सुरुवातीचा होता. हा काळ मोठ्या जोखमीचा आणि दबावाखाली स्वत:ला सिद्ध करण्याचा होता. इथूनच त्या एका पक्षातील बंडखोर नेत्याऐवजी एका नव्या राजकीय शक्तीचे केंद्र बनल्या. सिंगूर आणि नंदीग्राम आंदोलनांनी बंगालचे राजकारण कायमचे बदलले. त्यांनी स्वत:ला जमीन, उपजीविका आणि सन्मानाचे रक्षक म्हणून उभे केले. या आंदोलनांमुळे जरी कॉर्पोरेट जगताशी त्यांचे अंतर वाढले असले, तरी शेतकरी आणि ग्रामीण मतदारांशी त्यांचे अतूट नाते निर्माण झाले.२०११ मध्ये, जेव्हा पुन्हा एकदा शनीचा प्रभाव वाढला, तेव्हा ममता बॅनर्जींनी ३४ वर्षांची डाव्या आघाडीची सत्ता संपवून मुख्यमंत्रीपद भूषवले. सत्तेत आल्यावर टाटा नॅनो प्रकल्पातील जमीन शेतकऱ्यांना परत करण्याचा निर्णय राजकीयदृष्ट्या निर्णायक ठरला. त्यांच्या १५ वर्षांच्या सत्ताकाळात अनेक लोककल्याणकारी योजना राबवल्या गेल्या, पण त्याच वेळी भ्रष्टाचार, राजकीय हिंसाचार आणि बेरोजगारी या मुद्द्यांवरून विरोधकांनी त्यांच्यावर हल्लेही केले. शुभेंदु अधिकारी यांच्यासारख्या नेत्यांमुळे भाजपाने त्यांना मोठे आव्हान दिले आहे. डावे आणि काँग्रेस वेगळे लढत असल्याने विरोधकांची मते विभागली जाण्याची शक्यता आहे.गेल्या १५ वर्षांपासून तृणमुल कांग्रेसची पश्चिम बंगालमध्ये एकहाती सत्ता आहे. सत्तेविरोधी लाट आणि असंतोष असला तरी, ममता बॅनर्जींचे राजकारण आजही जनतेच्या भावनिक विश्वाशी जोडलेले आहे. त्यांच्या जन्मकुंडलीतील ग्रहमान आणि राजकीय पकड पाहता, त्या पुन्हा एकदा सत्तेवर येतील असे दिसते. ममता बॅनर्जी सलग चौथ्यांदा पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री म्हणून पुनरागमन करण्यास सज्ज आहेत.

## चर्चित अधिकारी काजल मीना लाच प्रकरणी जागेवर निलंबित

भ्रष्टाचाराच्या प्रकरणात अटक झाल्यानंतर राजस्थान सरकारने राजस्थान प्रशासकीय सेवेतील अधिकारी काजल मीणा यांना निलंबित केले आहे. शनिवारी राज्य सरकारने यासंदर्भात अधिकृत आदेश जारी केला. समाजात सकारात्मक बदल घडविण्याच्या उद्देशाने प्रशासनात दाखल झाल्याचे सांगणाऱ्या काजल मीना स्वत:च भ्रष्टाचाराच्या प्रकरणात तुरूंगात गेल्याने संपूर्ण देशात त्यांची चर्चा होत आहे. करौली जिल्ह्यातील नादोती येथे उपविभागीय अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या काजल मीना यांना भ्रष्टाचार प्रतिबंधक विभागाने अर्थात एसीबीने १६ एप्रिल रोजी अटक केली. सरकारी काम करून देण्याच्या बदल्यात काजल मीना, त्यांचा सहकारी आणि अन्य एका कर्मचाऱ्याने ६० हजार रुपयांची लाच मागितल्याचा आरोप आहे. प्राथमिक तपासात त्या दोषी आढळल्यानंतर एसीबीने ही कारवाई केली. एसीबीच्या पथकाने सवाई माधोपूर युनिटर्माफत कारवाई केली. तक्रारदाराच्या तक्रारीची पडताळणी केल्यानंतर छापा टाकण्यात आला. सुरुवातीला १ लाख रुपयांची मागणी करण्यात आली होती. नंतर ६० हजार रूपयांवर तोडगा काढण्यात आला. काजल मीना यांच्या सहकाऴ्याने त्याच्यासाठी १० हजार तर मॅडमसाठी ५० हजार रूपयांच्या लाचेची मागणी केली होती. कार्मिक विभागाच्या आदेशानुसार, राजस्थान नागरी सेवा नियम १९५८ च्या नियम १३ अंतर्गत, राज्य सरकारने काजल मीणा यांना अटकेच्या तारखेपासून निलंबित करण्याचा निर्णय घेतला आहे. निलंबनाच्या काळात त्यांचे मुख्यालय जयपूर येथील कार्मिक विभागाच्या कार्यालयात असेल. काजल मीणा या अत्यंत हुशार अधिकारी म्हणून ओळखल्या जातात. त्यांनी आयआयटी मंडीमधून इलेक्ट्रिकल इंजिनीअरिंगमध्ये बी-टेक केले आहे. आरएएस अधिकारी होण्यापूर्वी त्यांनी दिल्लीत दूरसंचार विभागात अधिकारी म्हणून काम केले आहे. २०१४ च्या तुकडीतील त्या एऊ प्रवर्गातील टॉपर आहेत. त्यांची पहिली नियुक्ती प्रतापगडमध्ये झाली होती, परंतु त्यांनी तिथे पदभार स्वीकारला नव्हता. त्यानंतर त्यांना नादोती (करौली) येथे एसडीएम म्हणून नियुक्ती मिळाली होती.काजल मीणा यांच्या अटकेनंतर त्यांचा एक जुना मॉक इंटरव्यू व्हिडिओ मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे. या व्हिडिओमध्ये त्या नैतिकता आणि प्रशासकीय सेवेद्वारे समाजात सकारात्मक बदल घडवण्याबद्दल बोलताना दिसत आहेत. ज्या अधिकाऱ्याने मुलाखतीत प्रामाणिकपणाचे धडे दिले, तीच अधिकारी लाच घेताना पकडली गेल्याने सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे.

## सीबीआयचे सहसंचालक दोषी; आयआरएस अधिकाऱ्याच्या घरावर टाकला होता छापा

**२५ वर्षे जुन्या प्रकरणात अधिकाराचा गैरवापर**

दिल्लीतील तीस हजारी न्यायालयाने २५ वर्षे जुन्या प्रकरणात ऐतिहासिक निकाल दिला आहे. १९ ऑक्टोबर २००० टाकण्यात आलेल्या एका छाप्यासाठी सीबीआयचे विद्यमान सहसंचालक आणि दिल्ली पोलिसांच्या एका निवृत्त अधिकाऴ्याला दोषी ठरवलंय.

सीबीआयचे सहसंचालक रामनीश आणि निवृत्त सहायक पोलीस आयुक्त व्ही. के. पांडे यांना भारतीय दंड संहितेच्या (आयपीसी) कलम ३२३, ४२७, ४४८ आणि ३४ सह विविध कलमांखाली दोषी ठरवलं. तीस हजारी न्यायालयाचे न्यायाधीश शशांक नंदन भट्ट यांनी हा निकाल दिलाय.

**काय होतं नेमकं प्रकरण?**

हे प्रकरण १९८५ च्या बॅचचे आयआरएस अधिकारी आणि त्यावेळी दिल्लीत अंमलबजावणी विभागाचे उपसंचालक म्हणून कार्यरत असलेल्या अशोक कुमार अग्रवाल यांच्या घरावरील छापासंदर्भातील आहे. अशोक कुमार अग्रवाल यांनी आरोप केला होता की, १९ ऑक्टोबर २००० रोजी त्यांच्या घरी झालेली झडती आणि अटक पूर्णपणे चुकीची आणि द्वेषपूर्ण होती.

**न्यायालयाने निकाल देताना काय म्हटलं?**

तीस हजारी न्यायालयाने निकालात देताना म्हटलंय की, हा छापा केवळ केंद्रीय प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या (कॅट) २८ सप्टेंबर २००० च्या आदेशाला बगल देण्यासाठी टाकण्यात आला होता. कॅटने चार आठवड्यांच्या आत अग्रवाल यांच्या निलंबनाचा रविचार करण्याचे निर्देश दिले होते.

न्यायालयाच्या मते, या आदेशाचे पालन करण्याऐवजी, सीबीआय अधिकाऴ्यांनी १८ ऑक्टोबर २००० रोजी संध्याकाळी एक गुप्त बैठक घेतली आणि दुसऱ्या दिवशी सकाळी अग्रवाल यांच्या घरावर छापा टाकून त्यांना अटक करण्याची योजना आखली. न्यायालयाने या संपूर्ण घटनाक्रमाला एक सुनियोजित कट असं म्हटलंय.

सुनावणीदरम्यान न्यायालयाने स्पष्ट नमूद केलं की, ही छापेमारी आणि अटक केवळ बेकायदेशीरच नव्हती, तर अधिकाराचा स्पष्ट गैरवापरही असल्याचे समोर आलं आहे. अधिकाऴ्यांनी आपल्या पदाचा वापर करून एका निरपराध अधिकाऴ्याचा छळ केल्याचे न्यायालयाने म्हटलं. तसंच या प्रकरणात दोषी सीबीआयचे सहसंचालक रामनीश आणि निवृत्त सहायक पोलीस आयुक्त व्ही. के. पांडे यांच्या शिक्षेची सुनावणी पण लवकरच होईल असंही न्यालयाने सांगितलं.

न्यायालयाकडून या प्रकरणात मुख्य निष्कर्ष काय?

▶ **अटक दुर्भावनेने प्रेरित होती:** निलंबनाचा आढावा घेण्याचे निर्देश देणाऱ्या कॅटच्या २८.०९.२००० रोजीच्या आदेशाला रद्द करण्याच्या उद्देशाने संपूर्ण कारवाई करण्यात आली होती, असे न्यायालयाचे मत आहे.

▶ **अधिकाराचा गैरवापर:** अधिकाऱ्यांची कृती अधिकृत कर्तव्याच्या कक्षेबाहेरची मानली गेली; फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १९७ अंतर्गत कोणतेही संरक्षण नाही.

▶ **जबरदस्तीने प्रवेश सिद्ध:** मुख्य दरवाजा तोडून उघडण्यात आल्याची पुष्टी आरोपीने दिल्ली उच्च न्यायालयात दाखल केलेल्या स्वत:च्या नोंदींवरूनही झाली आहे.

▶ **कोठडीतील हिंसाचार सिद्ध:** तक्रारदाराला फरफटत नेण्यात आले, मारहाण करण्यात आली; दुखापतीची पुष्टी एमएलसी , प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आणि प्रतिज्ञापत्रातील कबुलीद्वारे झाली आहे.

▶ **कट उघडकीस:** दक्षता विभागाच्या निर्देशांचे पालन करण्याऐवजी, १८.१०.२००० रोजी झालेल्या गुप्त बैठकीमुळे दुसऱ्या दिवशी सकाळी नियोजित छापा टाकण्यात आला.

▶ **तक्रारदार निर्दोष ठरला:** अखेरीस दोन्ही सीबीआय प्रकरणांमधून दोषमुक्त करण्यात आले.

**१९ ऑक्टोबर २००० च्या पहाटे काय घडलं होतं?**

न्यायालयात सांगण्यात आलं होतं की, १९ ऑक्टोबर २००० रोजी सकाळी ५ वाजता, सीबीआयच्या एका पथकाने कथितरित्या अग्रवाल यांच्या घरावर छापा टाकला होता. यावेळी सुरक्षा रक्षकावर हल्ला झाला. सीमाभिंत ओलांडून मुख्य दरवाजा तोडला गेला. तर कुटुंबातील सदस्यांना एका खोलीत कोंडून ठेवण्यात आले होत. तरदुसरीकडे अधिकाऴ्याला अंतर्वस्त्रांमध्ये बेडरूममधून फरफटत नेले आणि त्यांना मारहाण करून जखमी करण्यात आलं. धक्कादायक म्हणजे रुग्णालयात दाखल करण्यापूर्वी त्याला अज्ञात ठिकाणी नेण्यात आले होते.

## चारधाम यात्रा सुरू, गंगोत्रीनंतर यमुनोत्री धामचे दरवाजे उघडले, मोदींच्या नावानं पहिली पूजा

**उत्तरकाशी :** उत्तराखंडमध्ये आजपासून चारधाम यात्रा सुरू होत आहे. याची सुरुवात गंगोत्री धामचे दरवाजे उघडल्यानंतर आज १९ एप्रिलला दुपारी १२:३५ वाजता यमुनोत्री धामचे दरवाजे सहा महिन्यांसाठी उघडण्यात आले. आता भाविकांना सहा महिने यमुनोत्री धाम इथं यमुना मातेचं दर्शन घेता येणार आहे. दरम्यान, याआधी आज सकाळी ढोल-ताशांच्या गजरात माता यमुनेची पवित्र पालखी (डोली) खरशालीहून यमुनोत्री धामकडे रवाना झाली.

**जयघोषात आराध्य देवीला निरोप :** दरवर्षीप्रमाणे, आपल्या बहिणीला निरोप देण्यासाठी भाऊ शनि महाराज यमुनोत्री धाम इथं दाखल झाले आहेत. यमुनेची पालखी (डोली) प्रस्थानाच्या वेळी खरशाली आणि आसपासच्या गावांमधील ग्रामस्थांनी डोळ्यात पाणी आणून आणि जयघोषात आपल्या आराध्य देवीला निरोप दिला. ढोल, जयघोष आणि घोषणांच्या गजरात पालखी (डोली) संपूर्ण परिसरातून पुढं सरकली, ज्यामुळं भाविक भारावून गेले. दरम्यान, हिवाळ्यात यमुना मातेची मूर्ती खरशाली गद्दी इथं असते, याठिकाणी संपूर्ण विधीपूर्वक पूजा आणि दर्शन केलं जातं. मात्र, उन्हाळा सुरू झाल्यावर आता यमुना मातेची पूजा यमुनोत्री धाम इथं होईल.

**मोठ्या संख्येनं भाविक येण्याची शक्यता :** धार्मिक मान्यतेनुसार, माता यमुना भैय्या दूज (यम द्वितीया) पर्यंत यमुनोत्री धाममध्ये विराजमान असते. या काळात, भारत आणि परदेशातून लाखो भाविक दर्शनासाठी या तीर्थक्षेत्राला भेट देतात. तसंच, परंपरेनुसार खरशाली आणि आसपासच्या भागातील गावकरी माता यमुनेची पालखी घेऊन पायी यमुनोत्री धामपर्यंत प्रवास करतात, असंही म्हटलं जातं. दरम्यान, ही यात्रा केवळ श्रद्धेचं प्रतीक नाही, तर ती या प्रदेशाचा सांस्कृतिक वारसा आणि लोकपरंपरा देखील जिवंत ठेवते. चारधाम यात्रेच्या शुभारंभासोबतच, प्रशासन आणि मंदिर समितीनं यात्रेकरूंच्या सोयी, सुरक्षितता आणि सुलभ दर्शनासाठी व्यापक व्यवस्था केली आहे. येत्या काही दिवसांत यमुनोत्री धाममध्ये मोठ्या संख्येनं भाविक येण्याची शक्यता आहे.

**पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावानं पहिली पूजा :** आज अक्षय्य तृतीयेच्या निमित्तानं वैदिक मंत्रोच्चार, धार्मिक विधी आणि 'जय माँ गंगा'च्या जयघोषासह गंगोत्री धामचे दरवाजे भाविकांसाठी उघडण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी देखील उपस्थित होते. निश्चित मुहूर्तानुसार, दुपारी १२ वाजून १५ मिनिटांनी गंगोत्री धामचे दरवाजे भाविकांसाठी दरवाजे भाविकांसाठी उघडण्यात आले. यावेळी मंदिराच्या परिसरात हजारो भाविक उपस्थित होते. विशेष म्हणजे, गंगोत्री आणि यमुनोत्री धाम इथं पहिली पूजा पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावानं करण्यात आली.

**मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी काय म्हणाले? :** चारधाम यात्रेच्या सुरूवातीला उत्तराखंडचे मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी देशवासियांचं स्वागत केलं. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी सर्वांना चारधाम यात्रेत सहभागी होण्याचं आवाहन केलं. तसंच चारधाम यात्रा सुरक्षित आणि सुव्यवस्थितपणे पार पडावी, यासाठी आपल्या सरकारनं सर्व आवश्यक उपाययोजना केल्या असल्याचं त्यांनी सांगितलं. याचबरोबर, मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांनी या गोष्टीचा अभिमान व्यक्त केला की, गंगोत्री आणि यमुनोत्री धाममध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नावानं पहिली पूजा करण्यात आली. मुख्यमंत्री धामी म्हणाले की, ''पंतप्रधान मोदींना उत्तराखंडबद्दल खूप आपुलकी आहे.'' पुढं त्यांनी सांगितलं की, येत्या काही दिवसांत बद्रीनाथ आणि केदारनाथ धामचे दरवाजेही उघडतील. यानंतर राज्यात चारधाम यात्रा अधिकृतपणे सुरू होईल. यानंतर देवांची भूमी असलेल्या उत्तराखंडमध्ये श्रद्धेची लाट असेल.

## ४० व्या वर्षी दुसऱ्यांदा आई होणार दीपिका पादुकोण!

**मुंबई :** दीपिका पादुकोण व रणवीर सिंह यांची जोडी मनोरंजनविश्वात प्रचंड लोकप्रिय आहे. 'धुरंधर'च्या दोन्ही भागांच्या यशामुळे सध्या रणवीरचं सर्वत्र भरभरून कौतुक करण्यात येत आहे, त्यामुळे दीपिका-रणवीरच्या घरात सुद्धा आनंदाचं वातावरण आहे. अशातच अभिनेत्रीने आणखी एक गुडन्यूज तिच्या तमाम चाहत्यांना दिली आहे. दीपिका-रणवीर आता दुसऴ्यांदा आई-बाबा होणार आहेत. प्रेग्नन्सी किटचा फोटो शेअर करत दीपिकाने ही आनंदाची बातमी तिच्या इन्स्टाग्रामवर शेअर केली आहे. यामध्ये त्यांची लेक दुआची सुद्धा झलक पाहायला मिळत आहे.दीपिका व रणवीरच्या घरी लवकरच त्यांच्या दुसऱ्या बाळाचं आगमन होणार आहे. यांच्या लेकीचं नाव 'दुआ' असून तिचा जन्म ८ सप्टेंबर २०२४ रोजी झाला. दुआ एक वर्षांची झाल्यावर दिवाळीच्या शुभमुहूर्तावर दीपिका-रणवीरने तिचा चेहरा चाहत्यांसमोर रिव्हिल केला होता. गेल्या काही दिवसांपासून दीपिका दुसऱ्यांदा आई होणार असल्याच्या चर्चा सोशल मीडियावर रंगल्या होत्या. पण, आता अभिनेत्रीने स्वत: अधिकृत पोस्ट शेअर करत ही गुडन्यूज सर्वांना दिली आहे.

## छत्रपती संभाजीनगरात 'इच्छापत्र ' जनजागृती सेमिनार उत्साहात संपन्न




**छत्रपती संभाजीनगर ( प्रतिनिधी ) :** महावीर इंटरनेशनलच्या वतीने महावीर भवन येथे शनिवारी सायंकाळी ६ ते १० या वेळेत 'इच्छापत्र विषयावर मार्गदर्शनपर सेमिनार उत्साहात पार पडला. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या सेमिनारला संस्थेचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख उपस्थितांमध्ये पुखराज पगारिया, मिठालाल कांकरीया, जी. एम. बोथरा, हर्षवर्धन जैन, पारस ताथेड, पारस छाजेड, गौतम संचेती, अनिलमामा संचेती, राजेश कांकरीया, महावीर पाटणी, प्रकाश मुगदिया, दिलीप मुगदिया, हेमलता मुगदिया, विमलाराणी बाफना आदींचा समावेश होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भक्ती संकलेचा यांनी प्रभावीपणे केले.

कार्यक्रमाची सुरुवात भक्तिगीत व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर प्रमुख वक्त्यांचा परिचय करून देण्यात आला.

मुख्य वक्ते म्हणून ॲड. अमोल काकडे, ॲड. रामेश्वर तोतला, सीए हुंडीवाला, वीर कैलाश बाफना, वीर डॉ. नंदलाल बोथरा, वीर सागर मुगदिया, वीर विकास पाटणी व वीर तेजस कमानी मंचावर उपस्थित होते.

सर्वप्रथम ॲड. अमोल काकडे यांनी इच्छापत्र म्हणजे व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याची संपत्ती कोणाला आणि कशा प्रकारे वाटप करायची याचे कायदेशीर दस्तऐवज असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की इच्छापत्र केल्यास कौटुंबिक वाद टाळता येतात तसेच वारसांना योग्य मार्गदर्शन मिळते. इच्छापत्र नसल्यास मालमत्तेचे वाटप कायद्याच्या प्रक्रियेनुसार होते, ज्यामुळे अनेकदा वाद निर्माण होऊ शकतात.

यानंतर सीए हुंडीवाला यांनी आयकर आणि आर्थिक नियोजनाच्या दृष्टीने इच्छापत्राचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की योग्य पद्धतीने तयार केलेले इच्छापत्र भविष्यातील आर्थिक अडचणी कमी करते आणि संपत्तीचे नियोजन सुलभ करते.

ॲड. रामेश्वर तोतला यांनी धार्मिक ग्रंथांतील तसेच उद्योगक्षेत्रातील उदाहरणे देत इच्छापत्र नसल्यास होणारे नुकसान स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, कायदेशीर सल्लागारांच्या मार्गदर्शनाखाली योग्य पद्धतीने इच्छापत्र तयार करणे अत्यंत आवश्यक आहे.

**इच्छापत्र तयार करताना खालील बाबींचा वक्त्यांनी विशेष उल्लेख केला:**

- इच्छापत्र लेखी स्वरूपात स्पष्ट व समजण्यास सोपे असावे
- दोन साक्षीदारांची सही आवश्यक असते
- वेळोवेळी इच्छापत्रात बदल करता येतो
- इच्छापत्र नोंदणी केल्यास अधिक सुरक्षितता मिळते
- संपत्तीचे स्पष्ट तपशील व वारसांची माहिती नमूद करणे गरजेचे

कार्यक्रमा दरम्यान उपस्थितांनी चर्चासत्रात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध शंकांचे निरसन करून घेतले. समारोप प्रसंगी वीर सागर मुगदिया यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व दानशूर व सहकाऱ्यांचे आभार मानले.

हा सेमिनार नागरिकांमध्ये इच्छापत्राबाबत जागरूकता निर्माण करणारा ठरला असून भविष्यात अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

## हर्षदा खानविलकर - सुनील बर्वे यांची इच्छा पूर्ण !

### प्रिया बापट उमेश कामत निर्मित 'आमच्या पिढीची गोष्टच वेगळी!' नाटकात झळकणार एकत्र



काही दिवसांपूर्वी प्रतिभावान अभिनेत्री हर्षदा खानविलकर यांनी सोशल मीडियावर एक व्हिडिओ शेअर करत ''रंगभूमी खूप मिस करतेय'' अशी मनापासूनची भावना व्यक्त केली होती. चित्रपट आणि मालिकांमध्ये दमदार कामगिरी केल्यानंतर पुन्हा नाटकाकडे वळायची त्यांची इच्छा यातून स्पष्ट दिसत होतीष्ठ मात्र संधी मिळत नसल्याची हलकीशी खंतही त्यांनी बोलून दाखवली होती.

याच दरम्यान अभिनेता सुनील बर्वे यांनीही आजच्या नवीन पिढीसोबत काम करण्याची इच्छा व्यक्त केली हे सगळे होत असतानाच अभिनेते आणि निर्माते प्रिया बापट आणि उमेश कामत यांनी हर्षदा खानविलकर आणि सुनील बर्वे यांची खास भेट घेतली आणि आपल्या नाटकाची स्क्रिप्ट त्यांना दिली. आणि या भेटीनंतर एक मोठी घोषणा करण्यात आली. ती म्हणजे नाटकाची.

अद्वैत दादरकर दिग्दर्शित 'आमच्या पिढीची गोष्टच वेगळी!' असं या नाटकाचं नाव असून, हे नाटक लवकरच रंगभूमीवर झळकणार आहे.

'आमच्या पिढीची गोष्टच वेगळी!' हे नाटक प्रिया बापट सादर करत असून निर्मिती सोनल प्रोडक्शन्सची आहे.

दिग्दर्शनाची धुरा अद्वैत दादरकर यांनी सांभाळली आहे. यात हर्षदा खानविलकर आणि सुनील बर्वे यांच्यासोबत अक्षर कोठारी, शर्मिला शिंदे, शंतनू ठवळी आणि वैशाली आंबवणे यांच्याही प्रमुख भूमिका आहेत.

लेखक अमोल पाटील यांच्या लेखणीतून साकारलेल्या या नाटकाची निर्मिती नंदू कदम यांनी केली आहे.

एक मात्र नक्की इतक्या दमदार कलाकारांची फळी एकत्र आली, तर मराठी रंगभूमीवर पुन्हा एकदा ''हाऊसफुल''चा बोर्ड झळकणार, यात शंका नाही!

# पोलीस भरतीसाठी निघालेल्या तरुणाचा अपघाती मृत्यू!

## नांदगाव तांड्यावर शोककळा; शिरूर चौफुली जवळ दुर्दैवी घटना

**हिंदू प्रकाश वार्ता । प्रतिनिधी**

**सोयगाव:** पोलीस भरतीसाठी तयारी करणाऱ्या तरुणाचा अपघाती मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी घडली. बबलू तालेब पठाण (वय २४) असे मृत तरुणाचे नाव असून,तो सोयगाव तालुक्यातील नांदगाव तांडा येथील रहिवासी होता.मिळालेल्या माहितीनुसार,बबलू पठाण हा धुळे येथे पोलीस भरतीच्या अनुषंगाने जाण्यासाठी निघाला होता.शिरूर चौफुली परिसरात त्याचा अपघात होऊन त्यात त्याचा मृत्यू झाला. या घटनेमुळे नांदगाव तांड्यावर शोककळा पसरली आहे.मृत बबलू हा शेतकरी कुटुंबातील असून, कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती.तीन एकर शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत होता. त्याच्या पश्चात आई,वडील,दोन भाऊ व दोन बहिणी असा परिवार आहे.कुटुंबातील जबाबदाऱ्या लक्षात घेऊन त्याने पोलीस भरतीसाठी अनेक दिवसांपासून मेहनत घेतली होती.याच उद्देशाने त्याने विवाहही पुढे ढकलला होता.कुटुंबियांच्या इच्छेनुसार त्याचा साखरपुडाही झाला होता.



शुक्रवारी नमाज अदा केल्यानंतर तो धुळे येथे जात असताना हा अपघात झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.एका होतकरू तरुणाचा अशा प्रकारे अकाली मृत्यू झाल्याने कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. मृतदेहावर अंत्यसंस्कार नांदगाव तांडा येथील दफनभूमीत करण्यात आले.या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून,परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

# वैजापूर पंचायत समिती कार्यालयात गाढवे घुसविणे पडले महागात!

## आंदोलनाला वेगळे वळण

**हिंदू प्रकाश वार्ता । प्रतिनिधी**

**वैजापूर :** भ्रष्टाचाराच्या आरोपांमुळे सतत चर्चेत असलेले वैजापूर पंचायत समिती कार्यालय पुन्हा एकदा एका कारनाम्याने चर्चेत आले आहे. गेल्या काही दिवसांपासून येथील पंचायत समिती कार्यालयाच्या मुख्य प्रवेशद्वारावर सुरू असलेल्या आंदोलकांनी थेट कार्यालयात गाढवं घुसवून धमाल उडवून दिली. त्यामुळे कार्यालयात मोठा गोंधळ उडाला. दरम्यान ऐन आठवडी बाजाराच्या दिवशी अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन शेतकऱ्यांना ताटकळत ठेवल्याचा आरोप यावेळी आंदोलकांनी केला आहे.

गेल्या काही दिवसांपासून पंचायत समिती कार्यालयाबाहेर काही कार्यकर्त्यांचे आंदोलन सुरू आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत नवीन कामांना मंजुरी द्यावी, तसेच सन २०२० पासून आजपर्यंत झालेल्या कामांमधील कथित भ्रष्टाचाराची चौकशी करावी, याशिवाय अनेक शेतकऱ्यांची देयके अद्याप प्रलंबित असून ती तत्काळ अदा करण्याची मागणी त्यांची आहे. आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, अनेक शेतकऱ्यांनी स्वत:च्या खर्चातून मग्रारोहयो अंतर्गत विहिरी व अन्य कामे सुरू केली. मात्र त्यांचे पैसे अद्याप मिळालेले नाहीत. त्यामुळे शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले असून प्रशासनाकडून कोणतीही दखल घेतली जात नसल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान सोमवारी आठवडी बाजाराचा दिवस असल्याने मोठ्या संख्येने शेतकरी आपल्या कामांसाठी पंचायत समिती कार्यालयात दाखल झाले होते. मात्र याच वेळी अधिकारी व कर्मचाऱ्यांची बैठक सुरू असल्याने कामकाज ठप्प झाले. 'ऐन कामाच्या दिवशीच बैठक घेण्याचे कारण काय?' असा सवाल आंदोलकांनी उपस्थित केला. आंदोलकांनी प्रशासनावर टीका करीत 'प्रशासन गाढवासारखे झाले असून त्यांना शेतकऱ्यांच्या प्रश्नांशी काहीही देणे-घेणे नाही' अशी संतप्त प्रतिक्रिया व्यक्त केली.

# छत्रपतींची आज्ञा हीच आपली प्रतिज्ञा आणि निसर्ग संवर्धन हीच खरी राष्ट्रसेवा!

## मराठवाड्यातील देशी वाणांच्या तब्बल ५ लक्ष रोपांच्या निर्मिती प्रकल्पाचा शुभारंभ



**हिंदू प्रकाश वार्ता । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** अक्षय्य तृतीयेच्या पवित्र मुहूर्तावर आमचे मित्र प्रशांत गिरे यांच्या जनसहयोग फाऊंडेशन आणि निसर्गप्रेमी मित्रपरिवार यांच्या संकल्पनेतून मराठवाड्यातील देशी वाणांच्या तब्बल ५ लक्ष रोपांच्या निर्मिती प्रकल्पाचा शुभारंभ करण्यात आला.

२०१७ पासून वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन क्षेत्रात सातत्याने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या या संस्थेशी महाराष्ट्रभरातील असंख्य वृक्षप्रेमी जोडले गेले आहेत आणि या चळवळीला मोठी चालना मिळाली आहे.संभाजीनगर-वेरूळ रस्त्यावरील शेळी-मेंढी पालन महामंडळाच्या जागेवर हा प्रकल्प उभारण्यात येत असून पावसाळ्याच्या सुरुवातीच्या प्री-वर्कलाही प्रारंभ झाला आहे.

या उपक्रमाचा केंद्रबिंदू म्हणजे नियोजनबद्ध वृक्षारोपण आणि प्रभावी संवर्धनातून समृद्ध पर्यावरण निर्माण करणे हा आहे. आजपर्यंत २५ हजारापेक्षा अधिक झाडांची लागवड आणि त्यांचे संगोपन यशस्वीपणे करून या संस्थेने एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला आहे.

पावसाळ्याच्या सुरुवातीला होणारी ही लागवड रोपांच्या उत्तम वाढीस पोषक ठरणार आहे आणि हरित पट्टा अधिक सक्षम होणार आहे. झाडे परिसराचे सौंदर्य वाढवतात, शुद्ध हवा निर्माण करतात आणि पर्यावरण संतुलन अधिक बळकट करतात ही जाणीव अधिक जागृत करणारा हा उपक्रम ठरत आहे असे प्रतिपादन फुलंब्रीच्या आ. अनुराधाताई चव्हाण यांनी केले.

या कार्यात विधान परिषद सदस्य श्रीकांत भारतीय, शहराचे प्रथम नागरिक, महापौर समीर राजूरकर, प्रशांत गिरे, वैद्य आण्णा, केळकर सर, डीसीएफ सुवर्णा माने मॅडम तसेच अनेक मान्यवर मंडळी सहभागी झाले होते.

यावेळी छत्रपती शिवरायांच्या आज्ञापत्राचे सामूहिक वाचन करून पर्यावरण संवर्धनाची सामूहिक प्रतिज्ञा करण्यात आली आणि देशी वाणांच्या झाडांचे महत्त्व तसेच त्यांची उपयुक्तता याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

निसर्गाशी सुसंवाद साधत विकासाचा मार्ग अधिक समृद्ध करण्याची ही एक सुंदर सुरुवात आहे. वृक्षारोपण आणि संवर्धनाच्या माध्यमातून आपण सर्वजण एक हिरवेगार, संतुलित आणि समृद्ध भविष्य घडवू शकतो हा विश्वास आहे, असे प्रतिपादन अतुल चव्हाण (मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, छत्रपती संभाजीनगर ) यांनी केले.

# वेतन न मिळाल्यास राज्यातील मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आंदोलनाच्या तयारीत

## मुख्याध्यापक संघटनेचा इशारा

**हिंदू प्रकाश वार्ता । प्रतिनिधी**

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र राज्य खाजगी प्राथमिक शाळा मुख्याध्यापक संघटनेच्या वतीने छत्रपती संभाजी नगर विभागीय शिक्षण उपसंचालक कैलास दातखीळ यांना निवेदन देऊन महाराष्ट्र राज्यातील खाजगी अनुदानित शाळेतील शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे माहे २०२६ चे वेतन पगार बिल युनिटकडे फॉरवर्ड होत नाही.

यासाठी संघटनेचे राज्याध्यक्ष मुख्याध्यापक प्रकाश सोनवणे यांच्या नेतृत्वात निवेदन देऊन खाजगी अनुदानित शाळातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी (लिपिक व शिपाई) यांचे वेतन आदा करण्यात यावी अशी मागणी केली. राज्यातील खाजगी प्राथमिक शाळा मध्ये ५०० विद्यार्थ्यांमागे एक लिपिक व एक शिपाई पदे मंजूर असून प्रत्येक जिल्ह्यात अंदाजे १०० पेक्षा जास्त कर्मचारी कार्यात आहेत व नियमित वेतन घेत आहे . परंतु सन



२०१३- १४ या शैक्षणिक सत्रा पासून सदरील पदे संच मान्यतेमध्ये आरटीई कायद्यानुसार मंजूर पदांमध्ये दर्शविली नाही .

परंतु लिपिक व शिपाई नियमित शाळेत कार्यरत असून वेतन घेत आहे. मार्च २६ पासून शाळेच्या शालार्थ प्रणालीमध्ये या शाळांची नोंदणी ते युनिट लेवलवर वेतन बिले फॉरवर्ड होत नाहीत त्यामुळे अशा शाळांचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन देयक झालेले नाही.

सदरील पदे अतिरिक्त नसून केवळ आरटीई कायद्यानुसार संच मान्यतेमध्ये मंजूर नसल्यामुळे त्यांचे वेतन देयके फॉरवर्ड होत नसून शाळांच्या शालार्थ प्रणालीमध्ये तात्काळ सुधारणा करून या शाळांना व शाळातील कार्यरत शिक्षक व शिक्षकेर कर्मचारी ( लिपिक व सेवक) यांचे वेतन त्वरित फॉरवर्ड होण्यासाठी कारवाई करण्यात येईल असे आश्वासन कैलास दातखीळ यांनी आश्वासन दिले आहे.

मुख्याध्यापक संघटनेने म्हटले आहे की, जर ८ दिवसांत शालार्थ प्रणालीमधील तांत्रिक अडचणी दूर झाल्या नाही तर महाराष्ट्र राज्यातील सर्वच मुख्याध्यापक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी रस्त्यावर उचलून आंदोलन करतील वेळ प्रसंगी न्यायालयीन लढा सुद्धा लढू असा इशारा संघटनेचे राज्याध्यक्ष प्रकाश सोनवणे यांनी दिला आहे. या नियोजनाच्या प्रती शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक आणि शिक्षणाधिकारी व वेतन पथक अधीक्षकांना दिलेले आहे.

# ‘माझा कर - माझी जबाबदारी’ मोहिमेद्वारे मालमत्ता कर वसुलीत वाढीसाठी संभाजीनगर मनपाचे पाऊल

**छत्रपती संभाजीनगर ( प्रतिनिधी ) :** आयुक्त छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका महापौर समीर राजूरकर यांच्या मार्गदर्शनात व श्री अमोल येडगे यांच्या संकल्पनेतून मालमत्ता कर वसुलीत वाढ करण्यासाठी ‘ माझा कर – माझी जबाबदारी’ ही विशेष कर आकारणी मोहीम राबविण्यात येणार आहे.

महानगरपालिकेच्या अभिलेखानुसार सुमारे ३.२० लाख मालमत्तांची नोंद असली तरी अद्याप अनेक मालमत्तांवर कर आकारणी झालेली नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे जास्तीत जास्त मालमत्तांना कराच्या कक्षेत आणून महसूल वाढविणे हा या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

ही मोहीम दि. २० एप्रिल ते १५ जून २०२६ या कालावधीत टप्प्याटप्प्याने राबविण्यात येणार असून, सर्व झोन कार्यालये व मुख्यालयात विशेष हेल्पडेस्क स्थापन करण्यात येणार आहेत. नागरिकांना कर आकारणीसाठी अर्ज सादर करणे, आवश्यक कागदपत्रे जमा करणे तसेच करासंदर्भात मार्गदर्शन या माध्यमातून मिळणार आहे.

प्राप्त अर्जांवर ७ ते १५ दिवसांच्या आत कार्यवाही करून कर आकारणी पूर्ण करण्यात येणार असून, आवश्यकतेनुसार तत्काळ कर निर्धारणाची सुविधाही उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

तसेच सर्वेक्षणात आणि गुंठेवारी मोहिमेत आढळलेल्या कर न आकारलेल्या मालमत्तांचा समावेश करून कर जाळ्यात मोठ्या प्रमाणावर वाढ करण्यात येणार आहे.

मोहीमेदरम्यान प्रत्येक झोनसाठी स्वतंत्र उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून, एकूण सुमारे ४५ हजार ६१५ नवीन मालमत्तांवर कर आकारणी करण्याचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे. याशिवाय, २०२५-२६ मध्ये कर न भरलेल्या मालमत्तांवर विशेष लक्ष केंद्रित करून वसुलीचे उद्दिष्टही निर्धारित करण्यात आले आहे.

नागरिकांच्या सोयीसाठी प्रत्येक झोन कार्यालयात ‘ कर समाधान डेस्क’ उभारण्यात येणार असून, करासंबंधित सर्व समस्या, आक्षेप निवारण व मार्गदर्शन एकाच ठिकाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे.

मोहीमेचा आढावा दर सोमवारी आयुक्त स्तरावर घेण्यात येणार असून, चुकीची कर आकारणी अथवा गैरप्रकार आढळल्यास संबंधित अधिकारी व कर्मचाऱ्यांवर कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे. तसेच दर शुक्रवारी सकाळी ११ वाजता कर समाधान शिबिर आयोजित करण्यात येईल व यावेळी कर संदर्भात असलेल्या समस्यांचा तत्काळ निराकरण केले जाईल.

यावेळी महापौरांनी नागरिकांना आवाहन केले की, या मोहिमेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा व नियमित कर भरून शहराच्या विकासात सक्रिय सहभाग नोंदवावा.

मनपा आयुक्त अमोल येडगे यांनी म्हटले की, नागरिकांनी या मोहिमेला सकारात्मक प्रतिसाद देत मालमत्ता कर आकारणी करून घ्यावी.

तसेच सर्वेक्षणासाठी येणाऱ्या पथकांना सहकार्य करावे. नागरिकांच्या अडचणी सोडविण्यासाठी आयुक्त दर आठवड्याला कर समाधान शिबिरात प्रत्यक्ष उपस्थित राहून आक्षेपांचे निवारण करणार आहेत.

# संभाजीनगरात १४-१५ जून रोजी ऑटोरिक्षा चालकांचे राज्यस्तरीय अधिवेशनाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** सुभेदारी गेस्ट हाऊस , छत्रपती संभाजी नगर येथे , ऑटोरिक्षा चालक मालक संघटना संयुक्त कृती समितीचे सरचिटणीस विलास भालेकर यांच्या प्रमुख उपस्थितीत औरंगाबाद ऑटो रिक्षा कृती समिती ची जिल्हास्तरीय बैठक संपन्न झाली .



अजंठा कॉन्फरन्सिंग हॉल येथील सर्व दलिय बैठकीत औरंगाबाद ऑटोरिक्षा कृती समिती बरखास्त करून लवकरच नवीन कार्यकारिणी ची नियुक्ती करण्यात येईल, असे जाहीर करण्यात आले. कोणत्याही संघटनेचा प्रमुख त्या संघटनेचा कुटुंब प्रमुख असतो . मतभेद आपसातच असावेत , बाहेर येता कामा नये , मानसन्मानाची पर्वा न करता जो कार्यकर्ता प्रामाणिकपणे ऑटो चालकांच्या हिता करीता काम करतो , तोच माझा खरा कार्यकर्ता आहे, असे संबोधन प्रसंगी ऑटोरिक्षा चालक मालक संघटना संयुक्त कृती समितीचे सरचिटणीस विलास भालेकर यांनी केले .

ऑटोरिक्षा चालक मालक संघटना संघटना संयुक्त कृती समितीचे कार्याध्यक्ष नरेंद्र वाघमारे ( विदर्भ ), सोबतच समितीच्या मराठवाडा विभागाचे कार्याध्यक्ष अहमद बाबा ( नांदेड ) , टायगर ऑटोरिक्षा संघटना नागपूर चे महासचिव प्रकाश साखरे, सहसचिव किशोर इलमकर, समितीच्या अकोला जिल्ह्याचे जिल्हाध्यक्ष शाकीर खान यांच्या प्रमुख उपस्थितीच्या बैठकीचे नियोजन ऑटोरिक्षा चालक मालक संघटना संयुक्त कृती समितीचेचे प्रवक्ता इमरान पठाण यांच्या नियोजनातून झालेल्या बैठकीत , येत्या जून महिन्यात राज्यस्तरीय अधिवेशन आयोजनाची जबाबदारी छत्रपती संभाजी नगर कृती समितीने घेतली व एकजुटीने अधिवेशनाला यशस्वी करण्याची जबाबदारी घेतली .

शनिवार १४ जून तथा रविवार १५ जून २०२६ असे दोन दिवसाचे अधिवेशन राहणार असून , त्याकरीता सर्व संघटनीय प्रमुख पदाधिकाऱ्यांची निमंत्रक कमिटी बनविण्यात आली आहे . या कमिटीचे स्वागताध्यक्ष मोईन इनामदार आणि समारोपीय अध्यक्ष अज्जू भाई यांना बनविण्यात आले आहे . यावेळी शेख लतिफ, मोहसीन सर, सरवर शेख ( कॅप्टन ), वसीम सिद्दी, शेख जुबेर, मोईन इनामदार, अज्जू भाई , निसार अहमद ,गजानन वानखेडे, प्रकाश हेडंगे पाटील , शेख अकील , इमरान पटेल, शेख जुबेर , शेख अमजद , सचिन गायकवाड , लिंबे पाटील, विजय सुरडकर, सुरेश जाधव , वसीम खान , शेख बद्रुद्दीन, माकीराम प्रधान , बशीर खान , अनीस अहमद , चव्हाण , मोहसीन , शेख जुबेर , प्रधान , फिरोज खान , मो. फारुख व इतर ऑटोरिक्षा चालक मालक संघटनेचे पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

# खून प्रकरणात पिता-पुत्राला जन्मठेपेची शिक्षा

## खुनाच्या गुन्ह्यात अतिरिक्त सत्र न्यायालयाचा निकाल

**हिंदू प्रकाश वार्ता । प्रतिनिधी**

**सोयगाव :** सोयगाव येथे जुन्या वादातून एका दांपत्यावर पिता,पुत्राने कोयत्याने वार केले. यात गंभीर जखमी शेतकऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.या प्रकरणात आरोपी ज्ञानेश्वर रामदास चौधरी (वय ५०) आणि हेमंत ज्ञानेश्वर चौधरी (वय. २१,दोघे रा.सोयगाव) यांना जन्मठेप आणि प्रत्येकी २५ हजारांच्या दंडाची शिक्षा जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.डी. खेडेकर यांनी ठोठावली.

मनीषा सुनील चौधरी (रा.चौधरी गल्ली सोयगाव) यांनी तक्रार दिली होती. त्यानुसार,तक्रारदार आणि त्यांचे पती सुनील चौधरी हे १७ जुलै २०२१ रोजी सायंकाळी शेतातील काम आटोपून दुचाकीने घरी परतत होते.त्यांचा मुलगा कार्तिक सायकलवरून मागून येत होता.लिहातांडा ते सोयगाव रस्त्यावर ज्ञानेश्वर आणि त्याचा मुलगा हेमंत यांनी त्यांना अडवले.जुन्या भांडणावरून दोघांनी शिवीगाळ करत अचानक हल्ला चढवला.ज्ञानेश्वरने कोयत्याने सुनील यांच्या डोक्यावर जोरदार वार केला.त्यानंतर खाली कोसळलेल्या सुनील यांना हेमंतने गळा आणि चेहऱ्यावरही वार करीत गंभीर जखमी केले. पतीला वाचवण्यासाठी मनीषा आल्या असता त्यांच्यावरही ज्ञानेश्वरने कोयत्याने वार केला. हल्ल्यानंतर सुनील रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध पडले. स्थानिकांच्या मदतीने त्यांना तातडीने हॉस्पिटलमध्ये दाखल केले.परंतु, उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.प्रकरणात सोयगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता.खटल्याच्या सुनावणीवेळी सहायक लोकाभियोक्ता बाळासाहेब महेर यांनी ११ साक्षीदारांचे जबाब नोंदवले. त्यात सिव्हिल हॉस्पिटलचे डॉक्टर आणि तक्रारदार यांची साक्ष महत्त्वाची ठरली. सुनावणीअंती न्यायालयाने दोघा आरोपींना दोषी ठरवून भादंवि कलम ३०२ अन्वये जन्मठेप आणि प्रत्येकी २५ हजार रुपये दंडाची शिक्षा आणि कलम ५०६,३४ अन्वये दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावली.दोन्ही शिक्षा आरोपींनी एकत्र भोगावयाच्या आहेत.प्रकरणात पैरवी अधिकारी म्हणून हवालदार नितीन जाधव यांनी काम पाहिले.

# एमजीएममध्ये एआययू अखिल भारतीय आंतर विद्यापीठ सायकलिंग स्पर्धा जल्लोषात संपन्न

## महाराजा गंगा सिंग विद्यापीठ आणि पंजाब विद्यापीठ सर्वसाधारण विजेतेपद पटकावत ठरले अव्वल!

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) :** असोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीज (एआययू) आणि महात्मा गांधी मिशन विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित चार दिवसीय अखिल भारतीय आंतर विद्यापीठ रोड सायकलिंग स्पर्धेचा समारोप आज आईनस्टाईन सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या स्पर्धेमध्ये पुरुष गटात महाराजा गंगा सिंग विद्यापीठ, बिकानेर यांनी तर महिला गटात पंजाब विद्यापीठ, चंदीगड यांनी उत्कृष्ट कामगिरी करत सर्वसाधारण विजेतेपदावर आपले नाव कोरले. विजयी संघास स्मृतिचिन्ह, पदक आणि प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

यावेळी भारतीय क्रीडा प्राधिकरण, छत्रपती संभाजीनगरच्या उपसंचालिका डॉ.मोनिका घुगे, महामार्ग सुरक्षा पथकाच्या पोलीस अधीक्षक रूपाली दरेकर, एआययुचे डॉ.दीपक कुमार सिंग, सायकलिंग असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे सचिव संजय साठे, सायकलिंग फेडरेशन ऑफ इंडियाचे धर्मेंद्र लांबा तर एमजीएम विद्यापीठाकडून कुलगुरू प्रा.डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, संचालक नितीन घोरपडे, विभागप्रमुख डॉ. दिनेश वंजारे, देशभरातून आलेले सायकलपटू,




अधिकारी – कर्मचारी यांच्यासह सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

आजच्या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.जैनब मिनाज यांनी केले तर आभार अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई यांनी मानले. या स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. श्रीनिवास मोतीयेळे, डॉ. सदाशिव जव्हेरी, प्रा. रहीम खान, डॉ. अमरदीप असोलकर, ऐश्वर्या आघाव, बालाजी शेळके, निलेश खरे, अर्जुन तोडके आदींसह सर्व संबंधितांनी परिश्रम घेतले.

# 'दैनिक हिंदू प्रकाश वार्ता'च्या प्रकाशन सोहळ्यातील क्षणचित्रे





















मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010

हे पत्र प्रकाशक, मालक **श्री. रोहित विकास पाटील** यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर-431001 येथून प्रकाशित केले. **संपादक : रोहित विकास पाटील** **email :** hinduprakashvarta@gmail.com **website :** www.hinduprakashwarta.com **PRGI No.**: MHMAR/25/A2358 **संपर्क क्र. : 7261999911**